महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने
अंतर्गत ग्रामपंचायतीद्वारे घेण्यात येणा-या कामांना
कार्यारंभ आदेश देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो २०१३/प्रक्र.१५६/रोहयो-१०-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १८ मार्च,२०१३.

**वाचा** :- १) शासन निर्णय क्र.मग्रारोहयो २०१०/प्रक्र ४७/रोहयो-१०, दिनांक ८ जून, २०१०.
२) शासन पत्र क्र. मग्रारोहयो २०११/प्रक्र.५३/कार्यपध्दती/रोहयो-१०-अ, दिनांक १२ मे, २०११.

**परिपत्रक :-**

संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ८ जून, २०१० अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार गट विकास अधिका-यांना प्रदान करण्यात आले आहेत.

०२. तसेच संदर्भाधीन शासन पत्र दिनांक १२ मे, २०११ अन्वये उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यतेनंतर कामाचे कार्यारंभ आदेश देण्याचे अधिकार सरपंच / ग्राम सेवक ग्रामपंचायत यांना देण्यात आलेले आहेत.

०३ यासंदर्भात शासनस्तरावर आढावा घेतला असतांना असे निदर्शनास आले आहे की, ज्या स्तरावरुन प्रशासकीय मान्यता देण्यात येते, त्याच स्तरावरुन कार्यारंभ आदेश देणे प्रशासकीयदृष्टया योग्य होईल.

०४. सबब यासंदर्भात आदेशीत करण्यात येत आहे की, दिनांक १.४.२०१३ पासून ग्रामपंचायत स्तरावरील शेल्फवरील कामांना प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर कार्यारंभ आदेशही गट विकास अधिकारी यांनी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून द्यावेत.

१) ग्रामपंचायत स्तरावरील मजूरांची मागणी विचारात घेऊन तदनंतर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात यावेत.

२) ग्रामपंचायत स्तरावरील अपूर्ण कामे पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावे. तदनंतरच नवीन कामांचे कार्यारंभ आदेश द्यावेत.

३) ग्रामपंचायत स्तरावर कामांची मागणी प्राप्त झाल्यानंतर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन तातडीने कामांना कार्यारंभ आदेश द्यावेत.

४) सद्यस्थितीत कार्यान्वयीन यंत्रणांच्या कामांना कार्यारंभ आदेश तहसिलदार देतात त्याच धर्तीवर दिनांक १.४.२०१३ पासून ग्रामपंचायत स्तरावरील सर्व कामांना गट विकास अधिकारी यांनी कार्यारंभ आदेश द्यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(आर.विमला)
उप सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन

२२/३/२०१३

१८.३.२०१३ KARYARAMBHA ADESH.DOC

Revision to circular No 2011/pra kra 53-karya padhathi/rohiyo EGS 10 A dated 12.5. 2011

1. The detailed guidelines relating to work procedure for work done by Gram Panchayat has been given in the above circular.
2. The instructions have been given that after demand for work is given by the labourers in Form NO. 4 , then the work order can be given by the Gram Panchayat from available shelf
3. However it has come to notice that in some places many works (particularly individual benefit works like wells) are started by Gram Panchayat
   --Without proper musters
   New works in shelf are started without completing old works first
4. In the case of line departments, the Tehsildar gives the works order, but in case of Gram Panchayat has been given the responsibility of starting works .
5. After careful consideration it has been decided that work order either for new works or to restart an old work will in future be given be BDO instead of GP .
6. However, the BDO must start the work within three days if the demand for works is received from Gram Panchayat or if he comes to know of it orally or written from other sources. Before starting the work he must ensure that there is no other work in progress in GP area either by GP or line department or that there is justification for starting the new work
7. As far as possible priority must be given to complete old works, and BDO will be held responsible for starting new works when old works are available for unskilled labourers
8. Since now GRS are taking attendance for both line and gram panchayat works, a single register of ongoing works must be kept in Panchayat Samiti (??)